नि.फौ.ख.क्र. ८४ /२०१६
शासन ..वि.. किरण
नि.क्र. ३८

**शासनतर्फे साक्षीदार क्र. ०६ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः– गजानन जनार्दन झोपे ,
वयः– ५५ वर्षे, व्यवसायः– पोहेका, ब.नं. १७५८ ,
सध्या नेमणुक पो.स्टे मुर्तिजापुर ग्रामीण, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. नि. वा. सबरदंडे यांचे मार्फत सुरु**

दिनांक २४.०१.२०१६ रोजी मी पोलीस स्टेशन मुर्तिजापुर (ग्रामीण)येथे स्टेशन नापोका म्हणून कार्यरत होतो. वरील दिनांकास माझी पोलीस स्टेशनमध्ये सकाळी ८.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत स्टेशन डायरी अंमलदार म्हणून डयुटी लागली होती. दरमयानच्या काळात फिर्यादी रविंद्र ज्ञानेश्वर गाडबैल हा पोलीस स्टेशनमध्ये जखमी अवस्थेत आला होता. मी त्याला विचारपुस केली असता त्याने सांगितले की, त्याला त्याच्या भावाने कोपईच्या दांडयाने डोक्यावर मारले. त्याने सांगितल्याप्रमाणे मी त्याचा रिपोर्ट लिहुन घेतला. आता मला सदरचा जबानी रिपोर्ट नि.क्र. १५ दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर मी आरोपीविरुध्द अपराध क्र. २/१६ भा.दं.वि.चे कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला. आता मला छापिल प्रथम खबरी अहवाल नि.क्र. १६ दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे**

साक्षीदार सकाळी ११.०० वाजतापासून न्यायालयात हजर आहे. दुपारी १२.०० वाजता आरोपीस त्याच्या अधिवक्त्यांना बोलावून आणण्यास पाठविले. आरोपीने त्याचे अधिवक्ता बाहेरगावी गेलयाचे सांगितले. साक्षीदारास काही प्रश्न विचारण्याचे नसल्याचे सांगितले. आरोपीने पुढील तारखेकरिता अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले. परंतु यावेळी १२.१० वाजले आहे. सकाळी ११.०० वाजतापासून साक्षीदार हजर असल्याचे माहिती असतांना आरोपीने आतापर्यंत कोणताही अर्ज दाखल केला नाही. साक्षीदाराचा पुरावा सुरु झाल्यानंतर सुध्दा कोणताही अर्ज दिला नाही. ज्यामुळे न्यायालयाचा वेळ व्यर्थ जात आहे. त्यामुळे वरील बाबींचा विचार करता साक्षीदाराचा उलटतपास काही नाही.

फेरतपास काही नाही.

दिनांक ०७.०५.२०१९

(यु. बि. पेठे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र. २), मूर्तिजापुर.